# हिंदी भाषेच्या संवर्धनासाठी जनजागृती सप्ताह

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मार्गाचे कार्यचलन करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने अलीकडेच हिंदी पखवाडा आणि दक्षता जनजागृती सप्ताह साजरा केला.

भारतीय संस्कृती, परंपरा आणि मूल्ये जपण्यात हिंदीने प्राथमिक भूमिका बजावली आहे. हिंदी भाषेच्या संवर्धनासाठी एमएमआरसीएलने विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. यात दक्षता जागरूकता सप्ताह पाळणे हे सर्व कर्मचारी, भागधारक इत्यादींना एकत्र आणण्यासाठीचे साधन असून, भ्रष्टाचार रोखण्यासाठी आणि त्याविरोधात लढा देण्यासाठी एकत्रित सहभाग घेण्यात आला आहे. एमएमआरसीएलमध्ये दैनंदिन व्यवहारात हिंदीच्या वापराला चालना देण्यासाठी हिंदी पखवाडा साजरा करण्यात आला. एमएमआरसीएलमध्ये न्याय्य, व्यावसायिक पद्धतींना प्रोत्साहन देणे आणि प्रामाणिकपणा आणि सचोटीची संस्कृती वाढवणे महत्त्वाचे ठरणार असल्याचे एमएमआरसीएलचे व्यवस्थापकीय संचालक रणजितसिंह देओल यांनी या वेळी सांगितले. हिंदी सप्ताहादरम्यान सर्व कर्मचाऱ्यांसाठी प्रश्नमंजुषा, अनुवाद आणि घोषवाक्य लेखन, अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. कामकाजाच्या सर्व पैलूंमध्ये सचोटीने आचारसंहितेचे पालन करण्याचे वचन त्यांनी या वेळी दिले.